प्रेस नोट

जा.क्र. २६७ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:– २३/०५/२०१८

# पोलीस स्टेशन भंडारा डि.बी.पथकाची कार्यवाही

भंडारा– डि.बी पथक पोलीस स्टेशन भंडारा यांनी सदर गुन्हयातील फिर्यादी राहुल भोंगाडे वय २७ वर्ष रा. सुभाष वार्ड शुक्रवारी भंडारा ने त्यांचा ट्रक क्र. एमएच ३६ एफ २९५२ हा बाल उदयान शिवाजी वार्ड पिंगलाई माता मंदिर समोर उभा दि. २६/४/२०१८ पासुन ठेवले असता ट्रकचे १० टायर स्टेपनीसह कि. २,००,०००/रु. चा दि. ०९/०५/२०१८ चे १२.०० वाजता ते दि. १०/०५/२०१८ चे ०६.०० वाजता दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याने फिर्यादीचे रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा नोंद करून तपासात होता.

सदर गुन्हयात मिळालेल्या गुप्त बातमी वरून मा. पोलीस निरीक्षक श्री. रविंद्र मानकर यांचे मार्गदर्शनाखाली डि.बी. पथक पोलीस स्टेशन भंडारा चे अधीकारी व कर्मचारी यांनी तपासाची गती अत्यंत योग्यतेने व कुशलतेने हाताळुन अज्ञात आरोपीचा शोध घेवुन शुक्रवारी भंडारा येथे गुप्त पध्दतीने सापळा रचुन दि. १४/०५/२०१८ रोजी आरोपीस अटक करून आरोपीकडुन चोरीस गेलेले ट्रकचे १० टायर स्टेपनीसह कि. २,००,०००/रु. चा माल हस्तगत करण्यात आला. आरोपीस पकडण्या करीता केलेल्या अथक प्रयत्नाबाबत मा. पोलीस अधीक्षक सा. यांनी गुन्हे प्रकटीकरण पथक पोलीस स्टेशन भंडारा येथील संपुर्ण पथकाचे कौतुक केले.

सदर संपुर्ण कार्यवाही मा. विनीता साहू पोलीस अधीक्षक सा. भंडारा तसेच मा. रश्मी नांदेडकर , अप्पर पोलीस अधीक्षक सा. भंडारा, मा. श्री. जोगदंड उपवीभागीय पोलीस अधीकारी सा. भंडारा, मा. रवींद्र मानकर पोलीस निरीक्षक सा. भंडारा यांचे मार्गदर्शनाखाली डि.बी. पथकातील पोउपनी. सचीन गदादे, पोहवा. पुरूषोत्तम शेंडे पो.ना. प्रशात गुरव, विजय तायडे, पोशी. मार्कड डोरले, क्रिष्णा कातकडे, संदीप बन्सोड, अतुल मेश्राम डि.बी.पथक पोलीस स्टेशन भंडारा यांनी पार पाडली.तपास पोहवा. पुरूषोत्तम शेंडे /३५१ पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत .

(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.